RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ११, अंक १२६] मंगळवार, सप्टेंबर ९, २०२५/भाद्रपद १८, शके १९४७ [पृष्ठे १२, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३१७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ९ सप्टेंबर, २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम,१९६२.**

क्रमांक जिपनि-२०२५/प्र.क्र.१२ज/पंरा-२.—मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक १९७५६/२०२१ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २०२५ रोजी पारित आदेशास अनुसरुन, ग्रामविकास विभाग, शासन अधिसूचना क्रमांकःजिपनि-२०२१/प्र.क्र.११७/पं.रा.२, दिनांक ३० सप्टेंबर २०२२ अन्वये निश्चित केलेल्या आरक्षणाचा ज्या जिल्हा परिषदांनी लाभ घेतलेला नाही अशा जिल्हा परिषदांचे आरक्षण रद्द करून व महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ यांच्या नियम २-अ च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे अडीच वर्षाच्या कालावधीकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या पदांची संख्या सोबतच्या अनुसूचित दर्शविल्यानुसार नव्याने विनिर्दिष्ट करीत आहे.

## अनुसूची

| अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ब | अ | ब | अ | ब | अ | ब |
| अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | अनुसूचित जाती (महिला) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | अनुसूचित जमाती (महिला) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्ग (महिला) यांच्यासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासतील (महिला) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| २ | २ | २ | ३ | ४ | ५ | ८ | ८ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ९ सप्टेंबर, २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम,१९६२.**

क्रमांक जिपनि-२०२५/प्र.क्र.१२/पंरा-२.—ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक १९७५६/२०२१ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २०२५ रोजी पारित आदेशास अनुसरुन ग्रामविकास विभाग, शासन अधिसूचना क्रमांकःजिपनि-२०२१/प्र.क्र.११७/पं.रा.२, दिनांक ३० सप्टेंबर २०२२ अन्वये निश्चित केलेल्या आरक्षणाचा ज्या जिल्हा परिषदांनी लाभ घेतलेला नाही अशा जिल्हा परिषदांचे आरक्षण रद्द करुन, ग्रामविकास विभाग, शासन अधिसूचना क्रमांक जिपनि-२०२५/प्र.क्र.१२/पंरा-२, दिनांक ९ सप्टेंबर २०२५ अन्वये राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या पदांची संख्या नव्याने विनिर्दिष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील नियम २-ब, २-क व २-ड मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासन, याद्वारे, राज्यातील भंडारा आणि गोंदिया या जिल्हा परिषदांकरिता त्यांना सध्या लागू असलेल्या आरक्षणाच्या कालावधीच्या समाप्तीच्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता, तसेच उपरोक्त जिल्हा परिषदा वगळून उर्वरित ३२ जिल्हा परिषदा गठीत होवून लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांच्या पदांचे वाटप सोबतच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्यानुसार नव्याने करण्यात येत आहे.

### अनुसूची

| अ.क्र. | जिल्हा परिषदांचे नांव | जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या आरक्षणाचा प्रवर्ग |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | ठाणे | सर्वसाधारण (महिला) |
| २ | पालघर | अनुसुसूचित जमाती |
| ३ | रायगड | सर्वसाधारण |
| ४ | रत्नागिरी | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ५ | सिंधुदुर्ग | सर्वसाधारण |
| ६ | नाशिक | सर्वसाधारण |
| ७ | धुळे | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ८ | नंदूरबार | अनुसूचित जमाती |
| ९ | जळगांव | सर्वसाधारण |

| | | |
|---|---|---|
| १० | अहिल्यानगर | अनुसूचित जमाती (महिला) |
| ११ | पुणे | सर्वसाधारण |
| १२ | सातारा | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| १३ | सांगली | सर्वसाधारण (महिला) |
| १४ | सोलापूर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| १५ | कोल्हापूर | सर्वसाधारण (महिला) |
| १६ | छत्रपती संभाजीनगर | सर्वसाधारण |
| १७ | जालना | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| १८ | बीड | अनुसूचित जाती(महिला) |
| १९ | परभणी | अनुसूचित जाती |
| २० | हिंगोली | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| २१ | नांदेड | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| २२ | धाराशिव | सर्वसाधारण (महिला) |
| २३ | लातूर | सर्वसाधारण (महिला) |
| २४ | अमरावती | सर्वसाधारण (महिला) |
| २५ | अकोला | अनुसूचित जमाती (महिला) |
| २६ | वाशिम | अनुसूचित जमाती (महिला) |
| २७ | बुलढाणा | सर्वसाधारण |
| २८ | यवतमाळ | सर्वसाधारण |
| २९ | नागपूर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ३० | वर्धा | अनुसूचित जाती |
| ३१ | भंडारा | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| ३२ | गोंदिया | सर्वसाधारण (महिला) |
| ३३ | चंद्रपूर | अनुसूचित जाती (महिला) |
| ३४ | गडचिरोली | सर्वसाधारण (महिला) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ९ सप्टेंबर २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२.**

क्र.जिपंनि-२०२५/प्र.क्र.१२/पं.रा.२.— मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक १९७५६/२०२१ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २०२५ रोजी पारित आदेशास अनुसरुन, ग्रामविकास विभाग, शासन अधिसूचना क्रमांकः जिपनि-२०२१/प्र.क्र.११८/पं.रा.२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अन्वये निश्चित केलेल्या आरक्षणाचा ज्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांनी लाभ घेतलेला नाही अशा जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्यांचे आरक्षण रद्द करून महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ ई च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्याकरिता अडीच वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) आणि महिला (अनुसूचित जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील पंचायत समित्यांच्या [भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४(१) द्वारे राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्रात पूर्णतः येणाऱ्या पंचायत समित्या वगळून आणि तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र क्र.५) च्या कलम ६७ च्या पोट कलम (५) च्या खंड (क) च्या चौथ्या परंतुकाखाली येणाऱ्या पंचायत समित्या वगळून] सभापतींच्या पदांची संख्या, खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नव्याने विनिर्दिष्ट करण्यात येत आहे.

## अनुसूची

| अनुसुचित जाती (१) | | अनुसूचित जमाती (२) | | नागरिकांचा मागास प्रवर्ग (३) | | सर्वसाधारण प्रवर्ग (४) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (अ) | (ब) | (अ) | (ब) | (अ) | (ब) |
| अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | अनुसूचित जाती (महिला) साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | अनुसूचित जमाती साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | अनुसूचित जमाती (महिला) साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या पदांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातीसह) राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गासाठी (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) (महिला) राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | सर्वसाधारण प्रव-र्गासाठी ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या |
| २० | २३ | १२ | १९ | ४५ | ४६ | ७५ | ८१ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ९ सप्टेंबर २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२.**

क्रमांक जिपंनि-२०२५/प्र.क्र.१२/पंरा-२.—ज्याअर्थी मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्रमांक १९७५६/२०२१ प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ मे २०२५ रोजी पारित आदेशास अनुसरुन ग्रामविकास विभाग, शासन अधिसूचना क्रमांक जिपनि-२०२१/प्र.क्र.११८/पं.रा.२, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ अन्वये निश्चित केलेल्या आरक्षणाचा ज्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांनी लाभ घेतलेला नाही अशा जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्यांचे आरक्षण रद्द करून, महाराष्ट्र शासनाने शासकीय अधिसूचना ग्रामविकास विभाग क्रमांक जिपंनि-२०२५/प्र.क.१२/परा.२ दिनाक ९ सप्टेंबर २०२५ अन्वये जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्याकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अशा जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील पंचायत समित्यांच्या [भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४(१) खाली, राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्रात पूर्णतः येणाऱ्या पंचायत समित्या वगळून आणि तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र ५) याच्या कलम ६७ च्या पोट कलम (५) च्या खंड (क) च्या चौथ्या परंतुकानुसार अंतर्भूत होणाऱ्या पंचायत समित्या वगळून] सभापतींच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील नियम २ फ यातील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्यांकरिता त्यांना सध्या लागू असलेल्या आरक्षणाच्या कालावधीच्या समाप्तीच्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीसाठी, तसेच भंडारा व गोंदिया वगळून उर्वरित ३२ जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्या गठीत होऊन लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग (विमुक्त जाती व भटक्या जमातींसह) आणि महिला (अशा जाती, जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यामधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील पंचायत समित्यांच्या [भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४(१) खाली, राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्रात पूर्णतः येणाऱ्या पंचायत समित्या वगळून आणि तसेच (महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र ५) याच्या कलम ६७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (क) च्या चौथ्या परंतुकानुसार अंतर्भूत होणाऱ्या पंचायत समित्या वगळून] सभापतींची पदे सोबतच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नव्याने नेमून देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## अनुसूची

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | पंचायत समित्या | अनुसूचित जाती | | अनुसूचित जमाती | | नागरिकांचा मागास प्रवर्ग | | सर्वसाधारण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | अ | ब | अ | ब | अ | ब |
| | | | अनुसूचित जातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | अनुसूचित जातीसाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | अनुसूचित जमातीसाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (महिला) राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | सर्वसाधारण प्रवर्गासाठी जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या | महिलांसाठी राखून ठेवावयाच्या जिल्ह्यातील पंचायत समित्यांच्या सभापती पदांची संख्या |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | ठाणे | ४ | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | १ |
| २ | पालघर | २ | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ० |
| ३ | रायगड | १५ | ० | १ | १ | १ | २ | २ | ४ | ४ |
| ४ | रत्नागिरी | ९ | ० | ० | ० | ० | १ | १ | ३ | ४ |
| ५ | सिंधुदुर्ग | ८ | ० | १ | ० | ० | १ | १ | ३ | २ |
| ६ | नाशिक | १० | ० | १ | २ | १ | २ | २ | १ | १ |
| ७ | धुळे | २ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ |
| ८ | जळगांव | १५ | ० | १ | २ | १ | २ | २ | ३ | ४ |
| ९ | अहिल्यानगर | १३ | १ | १ | ० | १ | २ | २ | ३ | ३ |
| १० | पुणे | १३ | १ | ० | ० | १ | २ | २ | ३ | ४ |
| ११ | सातारा | ११ | ० | १ | ० | ० | १ | २ | ४ | ३ |
| १२ | सांगली | १० | ० | १ | ० | ० | २ | १ | ३ | ३ |
| १३ | सोलापूर | ११ | १ | १ | ० | ० | १ | २ | ३ | ३ |
| १४ | कोल्हापूर | १२ | १ | १ | ० | ० | १ | २ | ४ | ३ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | छत्रपती संभाजीनगर | ९ | ० | १ | ० | ० | १ | १ | ३ | ३ |
| १६ | जालना | ८ | १ | ० | ० | ० | १ | १ | २ | ३ |
| १७ | परभणी | ९ | ० | १ | ० | ० | १ | १ | ३ | ३ |
| १८ | हिंगोली | ५ | १ | ० | ० | १ | ० | १ | १ | १ |
| १९ | बीड | ११ | १ | ० | ० | ० | १ | २ | ३ | ४ |
| २० | नांदेड | १६ | २ | १ | १ | १ | २ | २ | ३ | ४ |
| २१ | धाराशिव | ८ | १ | ० | ० | ० | १ | १ | २ | ३ |
| २२ | लातूर | १० | १ | १ | ० | ० | १ | २ | ३ | २ |
| २३ | अमरावती | १२ | १ | २ | १ | ० | २ | २ | २ | २ |
| २४ | अकोला | ७ | १ | १ | ० | १ | १ | १ | १ | १ |
| २५ | वाशिम | ६ | ० | १ | ० | ० | १ | १ | २ | १ |
| २६ | बुलढाणा | १३ | २ | १ | ० | १ | २ | २ | २ | ३ |
| २७ | यवतमाळ | १६ | १ | १ | २ | २ | २ | २ | ३ | ३ |
| २८ | नागपूर | १३ | १ | १ | १ | १ | २ | २ | २ | ३ |
| २९ | भंडारा | ७ | १ | ० | ० | १ | १ | १ | १ | २ |
| ३० | गोंदिया | ८ | १ | ० | ० | १ | १ | १ | २ | २ |
| ३१ | चंद्रपूर | १५ | १ | १ | १ | २ | २ | २ | ३ | ३ |
| ३२ | वर्धा | ८ | ० | १ | १ | ० | १ | १ | २ | २ |
| ३३ | गडचिरोली | ५ | ० | १ | ० | १ | २ | १ | ० | ० |
| | **एकूण** | **३२१** | **२०** | **२३** | **१२** | **१९** | **४५** | **४६** | **७५** | **८१** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१ दिनांक ९ सप्टेंबर, २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२.**

क्रमांक जिपंनि २०२५/प्र.क्र.१२/पंरा-२.— महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदाचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ ई च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्याकरिता अनुसूचित जमाती (अनुसूचित जमातीमधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ (१) द्वारे राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या [महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र ५) याच्या कलम ६७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (क) च्या चौथ्या परंतुकानुसार अंतर्भूत होणाऱ्या पंचायत समित्या वगळून] खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नव्याने विनिर्दिष्ट करीत आहे.

### अनुसूची

| अनुसूचित जमाती साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या | अनुसूचित जमाती (महिला) साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या |
|---|---|
| (१) | (२) |
| **११** | **१३** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१, दिनांक ९ सप्टेंबर २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२.**

क्रमांक जिपंनि-२०२५/प्र.क्र.१२/पंरा-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना ग्रामविकास विभाग, क्रमांक जिपंनि- २०२५/प्र.क्र.१२/पंरा-२. दिनांक ९ सप्टेंबर २०२५ अन्वये, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्याच्या बाबतीत अनुसूचित जमाती (अशा जमातीमधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ (१) खाली राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या संपुर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या, नव्याने विनिर्दिष्ट केली आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ मधील नियम २ फ च्या पोट-नियम (१) च्या खंड (क) च्या तरतुदींनुसार, महाराष्ट्र शासन याद्वारे, ठाणे, पालघर, नाशिक, नंदुरबार, अमरावती व गडचिरोली जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्याच्या बाबतीत गठीत होऊन लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जमाती (अशा जमातीमधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, राज्यातील पंचायत समित्यांच्या, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ (१) खाली राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या संपुर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतींची पदे [महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र ५) याच्या कलम ६७ च्या पोट-कलम (५) च्या खंड (क) च्या चौथ्या परंतुकानुसार अंतर्भूत होणाऱ्या पंचायत समित्या वगळून] खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे नव्याने नेमून देण्यात येत आहे.

### अनुसूची

| अ. क्र. (१) | जिल्ह्याचे नाव (२) | अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतीच्या पदांची संख्या (३) | अनुसूचित जमाती (महिला) साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रात येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या (४) |
|---|---|---|---|
| १ | ठाणे | ० | १ |
| २ | पालघर | ३ | ३ |
| ३ | नाशिक | २ | २ |
| ४ | नंदुरबार | २ | २ |
| ५ | अमरावती | १ | १ |
| ६ | गडचिरोली | ३ | ४ |
| **एकूण** | | **११** | **१३** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

## ग्रामविकास विभाग

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक ९ सप्टेंबर २०२५.

### अधिसूचना

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२.**

क्रमांक जिपंनि-२०२५/प्र.क्र.१२/पंरा-२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम पाच) याच्या कलम ६७ च्या पोट-कलम (५) च्या तरतुदींनुसार अनुसूचित क्षेत्रातील ज्या पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा अधिक असेल अशा अनुसूचित क्षेत्रामधील पंचायत समित्यांचे सभापतींचे पद हे केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींकरीता राखून ठेवण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, नंदूरबार जिल्ह्यातील शहादा व नंदूरबार, धुळे जिल्ह्यातील साक्री व शिरपूर, नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले या पंचायत समित्यांमधील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी तेथील एकूण लोकसंख्येच्या ५०% पेक्षा अधिक आहे.

त्याअर्थी, आता महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र ५) च्या कलम ६७ च्या पोट-कलम (५) च्या चौथ्या परंतुकातील तरतुदींनुसार आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २-ई मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे नंदुरबार जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील शहादा व नंदुरबार, धुळे जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील साक्री व शिरपूर, नाशिक जिल्ह्यांच्या अधिकार क्षेत्रातील दिंडोरी तसेच अहिल्यानगर जिल्ह्याच्या अधिकार क्षेत्रातील अकोले या पंचायत समित्या गठीत होऊन लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता अनुसूचित जमाती (अनुसूचित जमातीमधील महिलांसह) यांच्यासाठी राखून ठेवावयाची सभापतींची पदे, खालील अनुसूची दर्शविल्यानुसार नव्याने नेमून देण्यात येत आहेत.

### अनुसूची

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतीच्या पदांची संख्या | अनुसूचित जमाती (महिला) साठी राखून ठेवावयाच्या राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतींच्या पदांची संख्या |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | नंदुरबार | १ | १ |
| २ | धुळे | १ | १ |
| ३ | नाशिक | ० | १ |
| ४ | अहिल्यानगर | १ | ० |
| | **एकूण** | **३** | **३** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व. मुं. भरोसे,**
शासनाचे सह सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.